**दी बँक ऑफ औंध, लिमिटेड.**

हेड ऑफिसः—१११।११२ सदाशिव पेठ, सातारा
शाखाः—औन्ध, आटपाडी, भवाननिगर व ओगलेवाडी.
मुंबई, पुणें, सांगली, सोलापूर, कऱ्हाड वगैरे
★ ठिकाणांवर ड्राफ्टस् दिले जातात.

**बचतीच्या आकर्षक योजना**

★ मुदत ठेवी आकर्षक दरानें १ ते ५ वर्षे पर्यंत स्वीकारल्या जातात.

★ सेव्हिंग बँकेंत रु. १५,०००/– पर्यंत ठेव ठेवतां येते. खात्यांतून आठवड्यांतून दोनदा चेकनें रकमा काढतां येतात. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.

बा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.



REGISTERED No. B. 3434


# अर्थ


वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख २५ मे, १९४९ | अंक २१



श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

श्री श्री

**युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण**
**वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.**

श्री श्री

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

## सर्व प्रसिद्ध माल

भिंतीला लावण्याचे व उभे ठेवण्याचे छोटे दिवे

| | |
|---|---|
| केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें १ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक |

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


# विविध माहिती

**विजेच्या अपुऱ्या पुरवठ्याचा परिणाम**—मेतूर येथील धरणांतील पाणी कमी झाल्यामुळें धरणावर उत्पन्न होणाऱ्या विजेचा पुरवठाच कमी पडणार आहे. ह्या परिस्थितीमुळें धरणाच्या विजेवर चालणाऱ्या कापड गिरण्यांनीं आपला विजेचा वापर २० टक्क्यांनीं कमी करावा अगर गिरण्यां दरमहा १० दिवस बंद ठेवाव्या अशी विनंति धरणाच्या एंजिअरनें केली आहे. त्याप्रमाणें दक्षिण हिंदुस्थानांतील कापड-गिरणीवाल्यांच्या संघातर्फे शिफारस करण्यांत आली आहे.

**अंदमानच्या वसाहतीसाठी म्हशी**—अंदमानमध्यें वसाहत करण्यास गेलेल्या २,००० बंगाली कुटुंबांना मदत-म्हणून हिंदुस्थान सरकारनें २४४ म्हशी देऊं केल्या आहेत. ह्या म्हशींपैकीं १४० विक्रीला विकत घेण्यांत आल्या आहेत. हिंदुस्थान सरकारच्या वसाहतीच्या योजनेप्रमाणें प्रत्येक निर्वासित कुटुंबाला १० एकर जमीन, एक दुभती म्हैस आणि दोन रेडे शेतकामासाठीं देण्यांत येणार आहेत. म्हशींचा आणि रेड्यांचा पहिला तांडा रवाना झाला असून येत्या जुलै महिन्यांत आणखी २०० म्हशी रवाना करण्यांत येणार आहेत.

**आंतरराष्ट्रीय मजूर परिषद्**—ह्या वर्षी भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेला हिंदी मजुरांतर्फे इंडिअन नॅशनल ट्रेड युनिअन कॉंग्रेस ही संस्था आपले प्रतिनिधी मागील वर्षांप्रमाणें पाठविणार आहे. परिषद् जिनीव्हा येथें पुढील महिन्यांत भरणार आहे. सरकारी पत्रकाप्रमाणें ऑल इंडिआ ट्रेड युनिअन कॉंग्रेस ह्या मजूर संघटनेंत ह्या वर्षी ६,८६,७२७ सभासद आहेत, तर इन्टक ह्या संघटनेंत ९,८३,९८३ सभासद आहेत. इंदूर येथें नुकत्याच भरलेल्या इन्टकच्या दुसऱ्या अधिवेशनाच्या वेळीं संघटनेच्या सभासदांची संख्या ११,८१,१०८ इतकी जाहीर करण्यांत आली आहे.

**यंत्रसामुग्रीची आयात**—२८ फेब्रुआरी १९५० अखेर संपणाऱ्या वर्षांत हिंदुस्थान स्वित्झरलंड देशांतून रेल्वेचे डबे आणि यांत्रिक हत्यारें करण्याच्या कारखान्यासाठी मिळून १६१ लाख रुपयांचें यंत्रसाहित्य आयात करणार आहे. त्याशिवाय पुढील मालाचीही आयात करण्यांत येणार आहे:— विजेचीं अवजड यंत्रें (६० लाख रुपये), इतर भांडवली माल (१०० लाख रुपये), विजेचीं उपकरणें, वैद्यकीय साहित्य इत्यादि (२० लाख रुपये), घड्याळें (७७ लाख रुपये). एकूण सर्व आयातीची किंमत सुमारें ७९५ लाख रुपये होईल असा अंदाज आहे. ह्याच काळांत हिंदुस्थान स्वित्झरलंडला १४,३०० टन शेंगदाणा, ४,००० टन शेंगदाण्याचें तेल, ४,००० टन आळशीचें तेल, १,००० टन मँगेनीज, २०० टन कॉफी, इत्यादि माल निर्यात करणार आहे.

**कम्युनिझमवर सहकाराचा तोडगा**—बंगलोर येथें अखिल भारतीय परिषदेचें ८ वें अधिवेशन नुकतेंच साजरें झालें. अशियांतील—त्यांतल्या त्यांत हिंदुस्थानांतील—सहकारी चळवळ अधिक भरभक्कम करण्याच्या दृष्टीनें परिषदेंत बरेच ठराव मंजूर करण्यांत आले. कम्युनिझमच्या प्रसाराला आळा घालावयाचा असेल तर सहकारी संस्थांची वाढ करणें हाच एक उपाय आहे असा सूर परिषदेनें व्यक्त केला. मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांनीं आपल्या कारभारांत सहकारी संस्थांसाठीं एक वेगळें खातेंच उघडावें, ही मागणी परिषदेंत पुन्हा एकदां करण्यांत आली.

**हिंदी भाषेंतून तारा**—आग्रा-अलाहाबाद, पाटणा-गया, नागपूर-जबलपूर, अलाहाबाद-बनारस, लखनौ कानपूर, ह्या शहरांच्या दरम्यान ता. १ जूनपासून हिंदी भाषेंत आणि देवनागरी लिपींत तारा स्वीकारणाऱ्याची सोय करण्यांत आली आहे. तारा स्वीकारण्याच्या अटी नेहमीप्रमाणेंच आहेत.

**अमेरिकेंत हिंदी इंजिनिअर**—अमेरिकेंतील रस्ते बांधण्याच्या पद्धतीचा अभ्यास करण्यासाठीं ९ हिंदी इंजिनिअर्स सध्यां अमेरिकेला गेले आहेत. रस्ते बांधण्याचें काम प्रत्यक्ष पाहणें आणि त्यांवरील व्याख्यानें ऐकणें ह्या कार्यक्रमांत वरील इंजिनिअर्स सुमारें साडेचार महिने घालविणार आहेत. येत्या दहा वर्षांत हिंदुस्थानांत १ लाख मैल लांबीचे नवे रस्ते करण्याची योजना आखण्यांत आली आहे. ह्या योजनेला उपयोगी पडण्यासारखी बरीच माहिती एंजिनिअर्सना अमेरिकेंत मिळूं शकेल.

**ब्रिटिश मोटारींच्या आयातीवर निर्बंध**—ता. २० मे, १९४९ पासून ब्रिटनकडून येणाऱ्या मोटारींवर निर्बंध घालण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे असें समजतें. आतांपर्यंत ब्रिटिश मोटारींची आयात खुल्या परवान्याप्रमाणें होत असे. हिंदुस्थान सरकारचा हा निर्णय ब्रिटिश मोटार कारखानदारांच्या संघाला कळविण्यांत आला आहे.

**सक्करचें धरण**—सक्कर येथील धरणाला उत्पन्न झालेला धोका आणि त्यावर धरणासंबंधींच्या तज्ज्ञांनीं सुचविलेले उपाय ह्या विषयीं सिंध सरकारनें विचारविनिमय केला. ह्या धरणाला भेगा पडण्याचा संभव असून त्याची दुरुस्ती करण्यासाठीं परदेशीय तज्ज्ञाचाहि सल्ला घेण्यांत आला होता. कांहीं तज्ज्ञांनीं तर वालुकामय प्रदेशांत धरण बांधल्याबद्दलच आश्चर्य व्यक्त केलें होतें.

**चहाबाबत व्यापारी करार**—ब्रिटनचें अन्नखातें आणि हिंद सरकार व पाकिस्तान सरकार ह्यांच्या दरम्यान चहाबाबत एक करार होणार असल्याचें समजतें. कराराप्रमाणें, ब्रिटिश सरकार ह्या वर्षी हिंदुस्थानकडून ३० कोटी पौंड आणि पाकिस्तानकडून ३ कोटी पौंड चहा विकत घेणार आहे. १९४८ साल-अखेर चालू असलेला करार संपण्याच्या वेळीं ज्या किंमती होत्या त्याच नवीन सौद्यासाठी ठरविण्यांत येतील. हिंद व पाकिस्तान खेरीज ब्रिटननें सीलोनकडून आणि पूर्व आफ्रिकेंतूनही चहा मिळविला आहे. ब्रिटनच्या अन्नखात्याची चहाची एकूण खरेदी ४ कोटी, ७५ लाख पौंड होते.

**कराचींत निर्वासितांची वेगळी वसाहत**—कराचींत निर्वासितांची सोय करणारी एक नवी वसाहत वसविण्यांत येत आहे. दर महिन्यांत ५०० नवीन घरें वसाहतीच्या भागांत बांधण्यांत येणार आहेत. ह्या हिशेबानें सर्व ६,००० इमारती एका वर्षांत तयार होतील असा अंदाज आहे. प्रत्येक इमारतींत दोन खोल्या, स्नानगृह, स्वयंपाकगृह आणि अंगण अशी सोय करण्यांत येईल.

# अर्थ

बुधवार, ता. २५ मे १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## टेक्स्टाइल गिरण्यांचे ताळेबंद काय दर्शवितात ?

### विक्री वाढली, नफे फुगले, सुवत्ता झाली !

१९४८ सालविषयक माहिती देणारे कित्येक गिरण्यांचे ताळेबंद व अहवाल प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून दिसून येणाऱ्या कांहीं प्रवृत्तींची कल्पना खालील माहितीवरून येईल.

१९४८ सालीं सर्वच गिरण्यांच्या विक्रीचा आकडा वाढला. उत्पादनांत तर वाढ झालीच, परंतु त्याबरोबर किंमत वाढीनेंहि हातभार लावला. गिरण्यांचें उत्पादन १३% वाढलें, तर एकूण खपाचें उत्पन्न ४०% वाढलें, असें खालील कांहीं प्रमुख गिरण्यांचे पुढील आकडे सांगतातः—

विक्री, लक्ष रुपये

| गिरणी | १९४५ | १९४६ | १९४७ | १९४८ |
|---|---|---|---|---|
| बॉंबे डाइंग | ५३२ | ४०६ | ४०० | ५६१ |
| कँबोडिया | ६८ | ५९ | ५३ | ८१ |
| सेंचरी | ३७३ | ३०९ | ३१५ | ४६७ |
| गोकाक | १२२ | ११७ | १११ | १४५ |
| कोहिनूर | ४५८ | ४०७ | ३८५ | ५४८ |
| मदुरा | १,१२१ | ९७६ | ९५९ | १,४२२ |
| स्वदेशी | २८६ | २५७ | २३७ | २८२ |
| टाटा | २०५ | २१० | २१८ | २७० |

विक्री वाढली, त्याप्रमाणें ठोक नफाहि वाढला. कच्च्या मालाची किंमत वाढली आणि मजुरी अधिक द्यावी लागली, तरी तयार मालाची किंमत त्यापेक्षां अधिक प्रमाणांत वाढली.

ठोक नफा, लक्ष रुपये

| गिरणी | १९४७ | १९४८ |
|---|---|---|
| बॉंबे डाइंग | ४७ | १२५ |
| कँबोडिया | ३ | २२ |
| सेंचरी | ५० | १०६ |
| गोकाक | २० | ४२ |
| कोहिनूर | ३० | १३१ |
| स्वदेशी | ३५ | ५६ |
| टाटा | ९ | २९ |

नियंत्रण काढून घेण्यांत आलें, त्यावेळीं किंमती भरमसाट वाढल्या त्याचा फायदा कार्यक्षम गिरण्यांना चांगलाच मिळाला. १९४७ मध्यें कपास, जळण व मजुरी ह्यांचें विक्रीशीं प्रमाण तीन प्रमुख गिरण्यांत ८१%, ७५% व ७६% होतें. १९४८ मध्यें तें अनुक्रमें ७५%, ६७%, ७४% असें झालें. मे–जून–जुलै ह्या संपूर्ण विनियंत्रणाच्या काळांत कपाशीची किंमत भयंकर चढली, तिचा फायदा साठावाल्या गिरण्या घेऊं शकल्या. १९४८ मध्यें मजुरींत साधारणतः फारशी वाढ झाली नाहीं आणि संपामुळें कामाचे दिवसहि १९४७ चे मानानें कमी वाया गेले.

गिरण्यांना १९४७ सालीं झालेल्या नफ्यांत गिरण्या व सरकार ह्यांचा वाटा सम प्रमाणांत होता, असें दिसतें. ११ प्रमुख गिरण्यांचे आकडे येथें दिले आहेतः—

( लक्ष रुपये )

| | १९४५ | १९४६ | १९४७ | १९४८ |
|---|---|---|---|---|
| घसारा | ३२ | ५२ | ३५ | ४९ |
| कर | ५१७ | २३० | ९३ | २९३ |
| निव्वळ नफा | १४५ | १६३ | १०९ | २९९ |
| कराचें निव्वळ नफ्याशीं प्रमाण | ३५७ | १४० | ८५ | ९८ |

सात प्रमुख गिरण्यांनीं १९४८ सालीं निव्वळ नफ्याच्या ६६% रक्कम रिझर्व्हमध्यें टाकली. १९४७ मध्यें हें प्रमाण ३४% होतें. डिव्हिडंड वाटणीवर सरकारनें नियंत्रण घातलें, त्याचा हा परिणाम आहे. सुमारें ५ कोटी रुपये अशा रीतीनें धंद्यांतच राहिले. १९४८ साल समृद्धीचें गेलें, तरी चालू वर्ष तितकें सुखाचें जाणार नाहीं आणि बाहेरच्या कारणांमुळें गिरण्यांना आलेली तेजी अंतर्गत कार्यक्षमतेविना टिकाव धरूं शकणार नाहीं. उत्पादन खर्च कमी करून परदेशी बाजारपेठा काबीज करण्याचा कार्यक्रम यशस्वी होणें गिरण्यांचा कारभार सुधारण्यावरच अवलंबून आहे.

---

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे सभेंत

## गैरहजर डायरेक्टरांचें प्रॉक्झी द्वारां मत

लिमिटेड कंपन्यांच्या साधारण सभेंत गैरहजर भागिदारांना प्रॉक्झीचे द्वारां मत देतां येतें. त्यांत नवीन असें कांहीं नाहीं. परंतु कंपन्यांच्या डायरेक्टर बोर्डाच्या सभांत गैरहजर डायरेक्टरलाहि असें मत देतां यावें काय ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. बडोद्याच्या अलेंबिक ग्लास इंडस्ट्रीज लि. च्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनमध्यें अशा प्रकारच्या मताधिकाराची तरतूद आहे. ही कंपनी बडोदा येथें १९४४ सालीं प्रथम प्रायव्हेट सबसिडिअरी कंपनी म्हणून नोंदण्यांत आली व तिचें ऑक्टोबर, १९४८ मध्यें पब्लिक लिमिटेड कंपनींत रूपांतर करण्यांत आलें. ह्या कंपनीच्या आर्टिकल्सप्रमाणें कोणताहि डायरेक्टर, बोर्डाच्या सभेंत समक्ष हजर राहून किंवा प्रॉक्झीचे द्वारां मत देऊं शकतो. अर्थात्, दुसऱ्या एखाद्या डायरेक्टरासच प्रॉक्झी द्यावी लागते. बिगर-डायरेक्टर सभेस हजर राहूं शकत नाहीं. डायरेक्टरांनीं कंपनीच्या कारभारावर देखरेख ठेवावयाची, त्यासाठी त्यांनीं एकत्र जमून चर्चा करावी व ठराव करावे असा प्रघात आहे व तो देखरेखीची जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीनें अत्यंत सयुक्तिकहि आहे. परंतु गैरहजर डायरेक्टरांनीं आपलें मत अगोदरच बनवून किंवा न बनवून तें दुसऱ्या करवीं देण्याचे पद्धतीमुळे विचारविनिमयास अवसर कमी रहातो, हें उघड आहे. मुंबईच्या शेअर होल्डर्स असोसिएशनच्या कमिटीनें ह्यासंबंधांत अलेंबिक ग्लास इंडस्ट्रीजला एक पत्र पाठवून, प्रॉक्झीची ही तरतूद आर्टिकल्समधून काढण्याची विनंति केली आहे.

**शेअर्सच्या संख्येवर डायरेक्टरांचीं मतें अवलंबून**

कांहीं कंपन्यांच्या आर्टिकलसमध्यें डायरेक्टरांच्या सभांतील मतनोंदणीबाबत दुसरी एक तरतूद केलेली आढळते. डायरेक्टरांनीं पात्रतेसाठी किती रकमेचे शेअर्स घेतले पाहिजेत, हें ठरविल्यानंतर किमान तेवढे शेअर्स घेणारा व त्यांपेक्षां कितीहि अधिक शेअर्स घेणारा, ह्यांच्या मतांचे अधिकारांत वास्तविक भेदाभेद असण्याचें कारण नसतें. बहुतेक कंपन्यांत तसा भेदाभेद नसतोहि. परंतु कांहीं कंपन्यांमध्यें, डायरेक्टरांच्या सभेंत मतें मोजतांना, त्यांच्या शेअर्सच्या प्रमाणांत त्यांना मताधिकार दिलेला असतो. उदाहरणार्थ, डायरेक्टरचे पात्रतेसाठी ५,००० रुपयांचे शेअर्स घेतले पाहिजेत असा कंपनीचा नियम आहे. बोर्डांचे १० सभासद आहेत. त्यांपैकीं दोघांनीं प्रत्येकीं २५ हजारांचे शेअर्स घेतलेले आहेत व बाकीच्यांनीं प्रत्येकीं ५ हजारांचे शेअर्स घेतलेले आहेत. मतमोजणीचे वेळीं, पहिल्या दोघांना प्रत्येकीं ५ मतें असतील व बाकीच्या आठांना प्रत्येकीं १ च मत असेल. सहाजकि दोघेजण (१० मतें) एक झाल्यावर केव्हांहि इतरांना माघार घ्यावयास लावतील. त्यामुळें, बाकीच्या डायरेक्टरांना आपल्या म्हणण्याचा ज्यास्त आग्रह कधींच धरतां येणार नाहीं. अशा रीतीनें, डायरेक्टर बोर्डाच्या सभेंत भागीदारांचे प्रतिनिधी संख्येनें ज्यास्त असले तरी सुद्धा अधिक शेअर्स धारण करणारे डायरेक्टर आपलें म्हणणें पास करून घेऊं शकतील व तो बोर्डाचा निर्णय गणला जाईल.

लिमिटेड कंपन्यांच्या आर्टिकलसमध्यें एकवाक्यता असावी व ठराविक आराखड्याचे पेक्षां वेगळे नियम कंपनीस करावयाचे असतील तर त्यासाठी सरकारची आगाऊ परवानगी आवश्यक करावी, अशी सूचना करण्यांत येत आहे तिचें रहस्य वरील विवेचनावरून लक्षांत घेतां येईल. कित्येक भागीदारांना आर्टिकलसचा अर्थ कळत नाहीं, परंतु आर्टिकलस वाचूनच आपण भागीदार झालों असल्याचा कबुलीजबाब मात्र त्यांनीं आगाऊ लिहून दिलेला असतो. कंपनी व तिचे मॅनेजिंग एजंट ह्यांचेमधील करारासंबंधींहि असेंच म्हणतां येईल. लिमिटेड कंपन्यांवरील जनतेचा विश्वास कायम रहावा, एवढेच नव्हे तर तो वाढावा, ह्या दृष्टीनें कंपन्यांच्या प्रवर्तकांनीं प्रयत्न केले पाहिजेत.

---

## प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को. असोसिएशनचें कार्य

ही संस्था ता. २८-१०-४६ ह्या दिवशीं स्थापन झाली आणि तिनें प्रत्यक्ष कार्यास प्रारंभ त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्यापासून केला. त्या वेळीं संस्थेच्या सभासदांची संख्या ११४ होती. ता. ३०-९-१९४८ रोजीं सभासदांची संख्या २५७ पर्यंत वाढली; ह्या संख्येंत १३१ इंडस्ट्रिअल को. सोसायट्या व ९६ संघटक होते. असोसिएशनचे अध्यक्ष श्री. एम्. डी. खटाव हे होते आणि उपाध्यक्षपद श्री. लालचंद हिराचंद ह्यांच्याकडे होतें.

पहिल्या वर्षी केवळ प्रचाराचें काम करण्याचें असोसिएशननें ठरविलें. प्रत्येक जिल्ह्यांत एक पगारी प्रचारक असावा असें ठरविण्यांत आलें. त्याप्रमाणें १७ जिल्ह्यांतून हे प्रचारक ३१ मार्च १९४८ पर्यंत काम करीत होते. संघटकांचीं कामें सामान्यतः पुढील स्वरूपाचीं होतीं. (१) निरनिराळ्या खेड्यांतून पसरलेल्या कारागिरांशीं परिचय करून घेणें. (२) त्यांच्या कामाची परिस्थिती माहिती करून घेणें आणि धंद्यांतील अडचणी समजावून घेणें. (३) त्यांच्या अडचणींचा सहकारी तत्त्वानें कसा निरास करतां येईल ह्याची त्यांच्याशीं चर्चा करणें. मालाची खरेदी, निपज आणि विक्री हे व्यवहार सहकारी संस्था स्थापन करून तिच्यामार्फत करण्याची शक्यता अजमावणें. (४) उत्पादकांच्या औद्योगिक सहकारी संस्था स्थापणें आणि त्या रजिस्टर करवून घेण्यास मदत करणें. (५) अस्तित्वांत असलेल्या संस्थांना कच्चा माल घेण्यास साह्य करणें, त्यांचा माल विकून देणें आणि तांत्रिक सल्लामसलत देणें. (६) सहकारी संस्थांना आपले हिशेब नीट ठेवण्यास मदत करणें. (७) सहकारी संस्था चालविण्याच्या पद्धतींचें शिक्षण देऊन कार्यकर्ते तयार करणें. (८) औद्योगिक सहकार ह्या विषयावर व्याख्यानें देणें व इतर रीतीनें प्रचार करणें.

निरनिराळ्या सहकारी संस्थांना लागणारा कच्चा माल व हत्यारेंपात्यारें विकत घेण्याचें काम असोसिएशन करीत असे. ३० सप्टेंबर १९४८ पर्यंत असोसिएशननें १,१३,६६६ रुपयांचा माल सहकारी संस्थांसाठी विकत घेतला. ह्या सौद्यावर असोसिएशन ½ टक्के कमिशन घेते. कांहीं वेळा तर हें कमिशन अवघें ¼ टक्के आकारण्यांत आलें आहे. मुंबई प्रांतांतील ५० टक्के सहकारी संस्था विणकरांच्या असल्यानें त्यांना लागणाऱ्या सुताचा प्रश्न असोसिएशननें हातीं घेतला. सुतावर, १९४८ मधील थोडा काळ सोडल्यास, नियंत्रण होतें. म्हणून असोसिएशनची नेमणूक सरकारनें सुताच्या वाटपाचे एजंट म्हणून करावी अशी मागणी करण्यांत आली. त्याप्रमाणें मुंबई सरकारनें मुंबईत निर्माण होणाऱ्या सुताचें विभागशः वाटप करण्याचें काम असोसिएशनकडे दिलें. असोसिएशननें ६४,३४,२८५ रुपयांचें सूत विकत घेतलें. त्यांपैकीं ४१,१४,९९१ रुपयांचें सूत १०-९-१९४८ पर्यंत विकलें गेलें होतें. असोसिएशनशीं जोडलेल्या संस्थांचा माल शक्यतोवर स्थानिक बाजारांतूनच विकला जावा अशी खटपट असोसिएशन करते. परंतु तसें शक्य न झाल्यास इतर जिल्ह्यांतून आणि मुंबईला त्यांचा माल खपविण्यास मदत करण्यांत येते. ३० सप्टेंबर १९४८ पर्यंत १३,५४५ रुपये किंमतीच्या कापडाची विक्री असोसिएशननें करून दिली. कापडाशिवाय इतर प्रकारचा ७१,६५८ रुपयांचा मालही विकून देण्यांत आला.

सहकारी संस्थांनीं तयार केलेल्या मालाचा दर्जा वाढावा, ह्या मालाच्या उत्पादनाची किंमत कमी करण्यांत यावी, त्यासाठीं अधिक चांगलीं हत्यारें वापरावीं आणि आधुनिक उत्पादनपद्धती अंमलांत आणल्या जाव्या अशीं अनेक उद्दिष्टें असोसिएशननें आपल्या डोळ्यासमोर ठेवलीं होतीं. हीं उद्दिष्टें पार पाडण्यासाठी तंत्रज्ञांची मदत घेण्यांत येत होती. निरनिराळ्या धंद्यांतील तज्ज्ञांच्या ज्ञानाचा फायदा मिळावा म्हणून असोसिएशननें अशा विविध तज्ज्ञांची नोंद करून ठेवली आहे. सहकारी संस्थांना लागणारा पैसा स्थानिक सहकारी बँकांकडून उभारण्यांत यावा असा प्रयत्न असोसिएशन करीत असते. परंतु कांहीं वेळा अशीं कर्जें बँकांकडून मिळणें कठीण जातें. अशा वेळीं असोसिएशननें स्वतःच अल्प मुदतीचीं कर्जें गरजू सहकारी संस्थांना पुरविलीं आहेत. ३०-९-४८ अखेर असोसिएशननें ४,५५१ रुपयांचीं अल्प मुदतीचीं कर्जें दिलीं होतीं.

---

**भरतपूरमधील मिठाच्या खाणी**—मत्स्य संघराज्यांतील मिठाच्या खाणी पुन्हां चालू करण्याचा समारंभ नुकताच साजरा झाला. गेलीं ८०० वर्षें ह्या खाणी बंद राहिलेल्या होत्या. खाणींतून दरवर्षी ३० लाख मण मीठ निघेल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

## आंतरराष्ट्रीय जागतिक करार

### गहूं देणारे व घेणारे देश: वाढलेल्या किंमतीनें खरेदी

वॉशिंगटन येथें ह्या करारावर मार्च महिन्यांत सह्या झाल्या. ह्या करारामध्यें ४६ कोटी बुशेल गव्हाची वार्षिक देवाण-घेवाण अंतर्भूत आहे. म्हणजे, गव्हाच्या जागतिक व्यापाराचा निम्मा भाग त्यांत येतो. १९४९-५० ते १९५२-५३ च्या वार्षिक कोट्याचा तपशील खाली दिला आहे:—

वार्षिक देवघेव

( हजार बुशेल गहूं; १ बुशेल = मापी ८ गॅलन )

| निर्गत करणारे देश | | आयात करणारे देश | |
|---|---|---|---|
| कॅनडा | २०,३०,७० | ग्रेटब्रिटन | १७,७०,६८ |
| अमेरिका | १६,८०,७० | इटली | ४,०४,१८ |
| ऑस्ट्रेलिया | ८,००,०० | हिंदुस्थान | ३,२२,८७ |
| फ्रान्स | ३३,०७ | नेदरलंडस | २,५७,२१ |
| युराग्वे | १८,३७ | बेल्जम | २,०२,०९ |
| | | ग्रीस | १,५७,२६ |
| | | ब्राझील | १,३२,२८ |
| | | द. आफ्रिका | १,१०,२३ |
| | | ऑस्ट्रिया | १,१०,२३ |
| | | आयर्लंड | १,०१,०५ |
| | | इतर २७ देश | ९,३४,७६ |
| एकूण | ४५,६२,८४ | एकूण | ४५,६२,८४ |

कॅनडा, अमेरिका व ऑस्ट्रेलिया ह्यांनीं देऊं केलेला कोटा गेल्या वर्षीच्या मानानें कमी झाला आहे. फ्रान्स व युराग्वे ह्यांचा, निर्गत करणाऱ्या देशांत प्रथमच समावेश होत आहे. इटली व हिंदुस्थान हे देश वगळले, तर आयात करणाऱ्या बाकीच्या सर्व देशांनीं आपला हमीचा कोटा उतरवला आहे. हिंदुस्थानचा वार्षिक कोटा २·८ कोटी बुशेल होता; आतां त्यानें वार्षिक ३·८ कोटी बुशेल घेण्याची हमी दिली आहे. येत्या चार वर्षांत गव्हाच्या आयाती-निर्गतीबाबत जागतिक परिस्थिति पुष्कळच बदलूं शकेल. गेल्या वर्षी फ्रान्सनें ३·६ कोटी बुशेल गहूं घेण्याचें मान्य केलें; आतां तो ३० लक्ष बुशेल गहूं निर्यात करण्यास तयार आहे. गव्हाचा पुरवठा वाढला असला तरी त्याची विक्रीची किंमतहि गेल्या वर्षीपेक्षा ज्यास्त ठेवण्यांत आली आहे, ती आयात करणाऱ्या देशांना जाचक वाटेल ह्यांत नवल नाहीं.

### पेडणेकर प्रॉपर्टी इनव्हेस्टमेंट लि., मुंबई

वरील कंपनी १९४४ सालीं खासगी लिमिटेड कंपनी म्हणून स्थापन झाली, तिचें आतां पब्लिक लिमिटेड कंपनींत रूपांतर करण्यांत आलें आहे. मुंबई सारख्या ठिकाणीं रहाण्याच्या घरांची जो तीव्र तुटवडा आहे, तो कमी करण्याचे प्रयत्न त्यामुळें अधिक नेटानें चालवितां येतील. जमीन खरेदी करून त्यांचे प्लॉट पाडणें, घरें-चाळी-बंगले बांधून ते भाड्यानें देणें-विकणें, जुनीं घरें विकत घेऊन तीं सुधारणें, इत्यादि कंपनीचे उद्देश आहेत. अशा तऱ्हेच्या प्रयत्नांस भरपूर वाव आहे, हें उघडच आहे. त्यामुळें कंपनीच्या यशांत भागीदारांनाहि चांगला हिस्सा मिळण्याजोगा आहे. मेसर्स कृष्णाजी मोतीराम अँड सन्स ( भागीदार: श्री. कृ. मो. पेडणेकर व श्री वा. मो. पेडणेकर ) कडे मॅनेजिंग एजन्सी आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल २५ लक्ष रु. असून त्यापैकीं ५ लक्ष रुपयांचें भांडवल विक्रीस काढलेलें आहे. प्रत्येक डायरेक्टरानें किमान १ हजार रुपयांचे शेअर्स घेतले पाहिजेत. श्री. शं. रा. गोखले, श्री. रा. ल. कस्तुरे, श्री. उ. द्वा. मस्तकार, हे तिघे आणि मॅ. एजन्सीचे दोघे सभासद हे डायरेक्टर बोर्डावर आहेत.

### मुंबई प्रांतामधील शिक्षणाची प्रगति

१९४७-४८ मध्यें मुंबई प्रांतांत शैक्षणिक संस्थांच्या संख्येंत २,९१९ नें वाढ होऊन ती २६,९१० पर्यंत गेली व विद्यार्थ्यांच्या संख्येंत ४६,०९,५४ नें वाढ होऊन २५,७५,८५९ पर्यंत ती संख्या झाली. प्रांतांत एकूण २१,६५७ शहरें व खेडीं आहेत. यापैकीं १४,१०४ गांवांत शाळा आहेत. सर्वसाधारणपणें ५·४ चौरस मैलास एक शाळा असें प्रमाण पडतें. गेल्या वर्षी ५·७ चौरस मैलास एक शाळा असें प्रमाण पडत असे. सर्व प्रकारच्या शाळांतून शिक्षण घेणाऱ्या मुलांचें प्रांतांतील पुरुष-संख्येशी १६·७१ टक्क्यांइतकें प्रमाण आहे. गेल्या वर्षी हेंच प्रमाण १४·१८ टक्के होतें. मुलींचें प्रमाण या वर्षी ७·६५ टक्के आहे, तर गुदस्त सालीं तें ५·७९ टक्के होतें.

#### शिक्षणावर झालेला खर्च

१९४७-४८ मध्यें शिक्षणावरील प्रत्यक्ष खर्चांत १७६·५ लाख रुपयांची वाढ होऊन तो खर्च १०,१९·८ लाख रुपयांइतका झाला; आणि अप्रत्यक्ष खर्चांत ६३·४ लाख रुपयांनीं वाढ होऊन तो १८०·२ लाख रुपयांपर्यंत गेला. शिक्षणासाठी १२,००,००,७७३ रुपये एकूण खर्च झाला. हा खर्च खालील प्रकारें भागविण्यांत आला.

| | रक्कम रुपये | एकूण खर्चाशीं प्रमाण % |
|---|---|---|
| सरकारी पैसा | ६,००,८१,५८३ | ५०·३ |
| बोर्डाचा पैसा | १,५९,२४,२०४ | १३·३ |
| फी | ३,०४,६३,८८८ | २५·४ |
| इतर | १,३५,३१,०९८ | ११·३ |
| | १२,००,००,७७३ | १००·० |

**हैदराबादच्या निजामाचे ट्रस्ट**—हैदराबादच्या निजामानें आपल्या मुलांकरितां आणि जवळच्या नातलगांकरिता ३ ट्रस्ट स्थापन करण्याचें ठरविलें आहे. पहिला ट्रस्ट २ कोटी रुपयांचा असून, तो निजामाच्या दुसऱ्या मुलासाठी आहे. तेवढ्याच रकमेचा दुसरा ट्रस्ट सुनेसाठी करण्यांत येणार आहे. ह्या ट्रस्टचा उपयोग सुनेच्या दोघा मुलांनाही होणार आहे. तिसरा ट्रस्ट ६ कोटी रुपयांचा असून तो निजामावर अवलंबून असणाऱ्या राजघराण्यांतील नातलगांसाठीं करण्यांत येणार आहे.

**मुंबई सरकारचा प्राप्तीकरांतील वांटा**—मुंबई सरकारनें, प्राप्तीवरील उत्पन्नावर घेण्यांत येणाऱ्या करांतील अधिक वाटा आपणास मिळावा म्हणून मध्यवर्ती सरकारकडे मागणी केली आहे. दक्षिणेकडची संस्थानें आणि गुजराथमधलि संस्थानें मुंबई प्रांतांत विलीन झाल्यानें ही मागणी करण्यांत आली आहे. मध्यवर्ती सरकारनें ह्या संबंधीं चौकशी करण्यासाठीं तज्ज्ञांची कमिटी नेमण्याचें ठरविलें आहे, असें समजतें.

**पाकिस्तान मधील बँकेवर निर्बंध**—पंजाब आणि काश्मीर बँक ह्या बँकेच्या पाकिस्तानांतील कोठल्याही शाखेला ता. १६ मे पासून ठेवी घेण्याला बंदी करणारा हुकूम पाकिस्तान सरकारनें काढला आहे. पाकिस्तानच्या नागरिकांच्या ठेवी परत करण्यांत बँकेनें दक्षता दाखविली नाहीं, म्हणून हा हुकूम काढण्यांत आला आहे.

## रत्नाकर बँकेची प्रगति

दि रत्नाकर बँक लि. नें १९४८ सालच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि उत्कृष्ट प्रगति केली आहे, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. बँकेचे चेअरमन श्री. बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी., ह्यांनीं बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं केलेल्या भाषणांतील बँकेच्या प्रगतिविषयक माहितीचे उतारे अन्यत्र देण्यांत आले आहेत, त्यांवरून गेल्या वर्षी बँकेंतील ठेवींत सुमारें ११½ लक्ष रुपयांची वाढ होऊन खेळतें भांडवल ४०% वाढल्याचें दिसून येईल. ही परिस्थिति इतर अनेक बँकांशीं तुलना करतां, अत्यंत स्पृहणीय आहे. पैसे गुंतवितांनाहि बँकेनें दक्षता बाळगलेली आहे आणि रकमा तरल्या ठेवल्या आहेत. बँकेचें भांडवल अल्पावधींत–पांच वर्षांत–४३ लक्ष रुपयांवर गेलें आहे. बँकेस निव्वळ नफा ५३,१०३ रु. झाला आहे. त्यापैकीं ११ हजार रुपये रिझर्व्ह फंडांत टाकून ऑर्डिनरी भागीदारांना द. सा. द. शे. ५⅛ प्रमाणें (वजा कर) डिव्हिडंड देण्यांत आलें, त्यास १२,३२० रु. लागले.

## दि युनियन बँक ऑफ कोल्हापूर लि.

### इमारतीचा उद्घाटन समारंभ

कोल्हापूर येथील दि युनियन बँक ऑफ कोल्हापूरच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ ता. २१ मे रोजीं सकाळीं १० वाजतां शेठ पांडुरंग शिवरामशेठ उपळेकर ( सराफ व जव्हेरी, कोल्हापूर ) ह्यांच्या हस्तें झाला. शेठ चुनीलाल माशिंगजी परमार हे बँकेचे चेअरमन असून, श्री. गोपाळ गणेश श्रीखंडे हे मॅ. डायरेक्टर आहेत.

१९४८ सालीं बँकेनें २६ लक्ष रुपये खेळत्या भांडवलावर ४६ हजार रुपये नफा मिळवून ९% डिव्हिडंड वाटलें. बँक बिल्डिंगची खरेदी किंमत १ लक्ष, ३ हजार रुपये आहे.

## दि कमर्शिअल बँक लि., कोल्हापूर

### ( १ ) प्रशासक कॅ. नंजप्पा ह्यांची भेट

कोल्हापूर येथील दि कमर्शिअल बँक लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. गणपतराव लक्ष्मणराव साळोखे, ह्यांच्या निमंत्रणावरून कोल्हापूरचे मुख्य प्रशासक, कॅ. नंजप्पा, ह्यांनीं बँकेच्या लक्ष्मीपुरींतील मुख्य कचेरीस भेट दिली आणि संतोष व्यक्त केला.

### ( २ ) रावसा. पी. बी. पाटील ह्यांचा सत्कार

रावसा. पी. बी. पाटील, बँकेचे एक प्रमुख सल्लागार व हितचिंतक, ह्यांची धारवाड जिल्ह्याचे कलेक्टर म्हणून बढतीवर नेमणूक झाली. त्यानिमित्त बँकेनें त्यांना मोठ्या समारंभानें निरोप दिला. बँकेचे व्हाइस चेअरमन श्री. जामसांडेकर हे अध्यक्षस्थानीं होते.

कमर्शिअल बँकेचें खेळतें भांडवल ४० लक्ष रुपयांहून अधिक आहे. १९४६ सालीं तिला ५३ हजार रु. नफा झाला व तिनें ८½% दरानें करमाफ डिव्हिडंड वाटलें.

## आशियाची वाढती लोकसंख्या व ऑस्ट्रेलिया

"जगाच्या लोकसंख्येंत दररोज ६०,००० लोकांची भर पडत आहे. त्यापैकीं ४३,००० लोक आशियांत जन्म पावत आहेत. १९५२ सालीं जपानची लोकसंख्या पावणे नऊ कोटींवर गेल्यावर तो देश तिला पोसूं शकणार नाहीं. इंडोनेशियाचीहि लोकसंख्या झपाट्यानें वाढत आहे. १२० कोटी लोक ऑस्ट्रेलियाच्या उत्तरेस समपिच आहेत ! बेल्जम आणि हॉलंड ह्या देशांप्रमाणें जमिनीचें उत्पादन आपण वाढविलें नाहीं, तर हा मोठा देश आपल्याकडे ठेवण्याचें आपणांस समर्थन करता येणार नाहीं. ऑस्ट्रेलियाचा कांहीं भाग रुक्ष असला, तरी ज्यू लोकांनीं टेलॅव्हिवमध्यें करून दाखविलेली कामगिरी आपणांस मार्गदर्शक होण्याजोगी आहे.":– ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान, जे. बी. चीफले, ह्यांचें भाषण.

बेडेकर
लोणचीं


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ४१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४३,००,००० |

—अद्ययावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर

## दि रत्नाकर बँक लि.ची ५ वी वार्षिक सभा

श्री. बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी., चेअरमन यांचें अध्यक्षीय भाषण.

( महत्त्वाचे उतारे )

सकृत् दर्शनी खालील गोष्टी सहजासहजीं आपल्या नजरेंत येण्यासारख्या आहेत.

ठेवी [ आंकडे हजार रु. चे आहेत. ]

| | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| | करंट | सेव्हिंग्ज | मुदत | एकूण |
| १९४७ | ११०२ | ८३१ | ७३८ | = २६७१ |
| १९४८ | १८६८ | ११७७ | ७६० | = ३८०५ |
| वाढ | + ७६६ | + ३४६ | + २२ | = ११३४ |

गुंतवणूक

| | कर्जरोखे | मुदत हुंड्या | कर्जें | बिलें | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९४७ | २०८ | ५७३ | ९५५ | २०७ | = १९४३ |
| १९४८ | ६०९ | ८११ | ९८५ | ५७४ | = २९७९ |
| वाढ | + ४०१ | + २३८ | + ३० | + ३६७ | = १०३६ |

एकूण ११ लाख, ३४ हजारांची ताळेबंदाच्या सालीं वाढ झालेली दिसेल, म्हणजे बँकेच्या खेळत्या भांडवलांत शे. ४० टक्क्यांनीं वाढ झालेली आहे. बँकेवरील वाढत्या विश्वासाचें व बँकेच्या सेवेचें हें फळ आहे, असें म्हटल्यास त्यांत आत्मस्तुति नसून तीं वस्तुस्थितिच आहे.

### वाढलेल्या भांडवलाचा योग्य विनियोग

१९४८ सालीं एकंदर ठेवींची जी वाढ झाली आहे, त्या एकंदर वाढीपैकीं एक तृतीयांशापेक्षां अधिक रक्कम बँकेनें सरकारी कर्जरोख्यांत गुन्तवून तेवढें भांडवल तरतें ठेवलें आहे.

सेव्हिंग खात्यामध्यें जेवढी वाढ झाली आहे, तेवढी रक्कम मुदत हुंड्यांच्या रूपानें व्यापाऱ्यांना अल्प मुदतीचीं कर्जें देऊन, त्यांच्या दैनंदिन व्यापारी गरजा भागवून, त्यांच्या वाढत्या व्यापाराला हातभार लावण्याचा प्रयत्न केला आहे.

करंट खात्यामधील बाकीची वाढ व्यापाऱ्यांचीं बिल्स व हुंड्या विकत घेऊन त्यांचें चलन वाढविण्याचा बँकेनें प्रामाणिकपणें प्रयत्न केला आहे.

अशा तऱ्हेनें गेल्या ५ वर्षांच्या कारकीर्दींत बँकेनें ४३ लाख रु. चें भांडवल उभें करून दक्षिण महाराष्ट्रांतील चांगल्या बँकांच्या मालिकेमध्यें आपलें स्थान अढळ केलें आहे, याबद्दल मला आनंद व अभिमान वाटतो.

ऑडिटरांच्या सल्ल्यानुसार सर्व तऱ्हेनें योग्य अशी तरतूद वजा जातां बँकेनें सन १९४८ सालीं एकूण निव्वळ नफा अंदाजें रु. ५३,००० चा केलेला असून तो गेल्या वर्षांपेक्षां थोडा अधिक आहे.

नवीन बँकिंग कायद्यानुसार रिझर्व बँकेकडे लायसेन्सकरितां अर्ज करतेवेळीं इतक्या स्वार्थत्यागानें व परिश्रमानें उभ्या केलेल्या या बँकेची परिस्थिति योग्य व समाधानकारक वाटावी म्हणून जरूर तीं तरतूद केलेली आहे.

डिव्हिडंड वाटण्याच्या पद्धतींतही ह्या वर्षी फरक केला आहे हें आपल्या लक्षांत आलेंच असेल. डिव्हिडंडच्या रूपानें जी रक्कम आतांपर्यंत वाटली गेली त्यावरील सर्व कर बँकेनें देऊन कर माफ केल्याचें जें सर्टिफिकेट प्रत्येक डिव्हिडंड वॉरंट बरोबर दिलें जात असे त्याचा फायदा शेअर होल्डर्सकडून क्वचितच घेतला जात असे व अशा रीतीनें सुमारें १ रुपयामागें ५ आणे इतकी रक्कम इनकमटॅक्स ऑफिसला दुबार जात आली आहे. म्हणून ह्या वर्षी हा बदल केला आहे, तो आपणांस मान्य होईल अशी आशा आहे.

### सावधतेचें व संयमाचें धोरण

बँकेचें एकन्दर धोरण अत्यंत सावधतेचें व संयमाचें असून नफ्याच्या वाढीकडे लक्ष न देतां बँकेची एकन्दर इभ्रत, ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास, व्यापाऱ्यांचें बँकेकडील दळणवळण व देवघेव व इकडील आर्थिक प्रपंचांतील आपलें महत्त्वाचें स्थान हें सतत वाढविण्याकडे व वाढवून तें टिकाविण्याकडे बँकेचें लक्ष कटाक्षानें आहे. उत्तरोत्तर आपणा सर्वांच्या एकजुटीच्या व एकदिलाच्या प्रयत्नांनीं आपल्या बँकेचें नांव व बँकेची कीर्ति उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाईल अशी उत्कट आशा मी प्रदर्शित करतों.

बँकेचें भांडवल बँकिंग कायद्याप्रमाणें योग्य प्रमाणांत वाढवून ती नजीकच्या काळांत शेड्यूल्ड करणेची सर्व तयारी चालू आहे. नवीन विक्रीस काढलेले शेअर्स ॲलॉट करण्यापूर्वी संस्थाने विलीन झाल्यामुळें दिल्लीहून कदाचित् परवानगी आणावी लागेल कीं काय याबद्दल तज्ञांमध्यें मतभेद आहे व त्याबाबत जरूर तो पत्रव्यवहार चालू आहे. लवकरच शेअर्स ॲलॉट करूं शकूं असा विश्वास आहे.

हिंदुस्थानांतील एकंदर आर्थिक परिस्थिति खरोखर अडचणीची अशी निर्माण झाली आहे. लोकांचेकडील आपलें येणें पूर्वीप्रमाणें चटकन वसूल होईलच असें नाहीं, म्हणून बँकांच्याकडून पूर्वी इतकींच कर्जें काढून त्यावर आपला वाढता व्यापार अवलंबून ठेवण्याची प्रथा व्यापाऱ्यांनीं सोडून द्यावी अशी माझी नम्र सूचना आहे. शक्य तेवढ्या कमी भांडवलांत आपण आपला व्यवहार कसा सुरळीत चालवूं शकूं याचा योग्य तो विचार करण्याची वेळ आतां आली आहे, असें मला वाटतें. आपण त्यांतील दर्दी व अनुभवी आहांतच.

आपल्या देशांतील या अत्यंत अडचणीच्या आर्थिक परिस्थितींत एकमेकांची अडचण वाढणार नाहीं, एकमेकांचा विश्वास कमी होणार नाहीं, एकमेकांतील सलोखा व सहनशीलता वाढावी, अशाच तऱ्हेचें धोरण व्यापारी, गिऱ्हाइक वर्ग, ठेवीदार व बँका ठेवतील अशी मला उत्कट आशा आहे.

---

**दुष्काळग्रस्तांना अन्नसत्त्वाच्या गोळ्या**—गुजरातमधील दुष्काळग्रस्त भागांतील अपुऱ्या अन्नावर रहाणाऱ्या मुलांसाठी सौराष्ट्र सरकारनें अन्नसत्त्वाच्या ३० लाख गोळ्या मोफत वाटण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं ४० हजार रुपये मंजूर करण्यांत आले आहेत.

**बटाट्याचें निरोगी बियाणें**—हिमाचल प्रदेशांत लागवड करण्यासाठी स्कॉटलंडहून रोगांना दाद न देणारें असें बटाट्याचें बियाणें आयात करण्यांत येत आहे. ह्या बियाण्यापैकीं पहिला एक मणाचा हप्ता विमानानें आणण्यांत आला. समुद्रमार्गानें आणखी एक टन बियाणें येत आहे. ह्या बियाण्यांची खास जोपासना करून येत्या कांहीं वर्षांत अशा प्रकारचें स्थानिक बियाणेंच सर्वत्र पुरविण्यांत येण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स बुधवार चौक, पुणें

## ब्रिटनच्या व्यापाराची परिस्थिति

( मा. म. का. )

ब्रिटनमध्यें चालू मे महिन्यांत भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनामध्यें विक्री मालाचा प्रचार करण्याच्या दृष्टीनें विशेष भर मालाचा उत्तम दर्जा, योग्य वेळीं त्वरित माल पाठविणें, कमी किंमत व एक प्रकारें गिऱ्हाईकाची मनधरणी करण्याचा प्रयत्न अशा गोष्टी दिसून येत आहेत. ही गोष्ट ब्रिटनच्या बदललेल्या परिस्थितीची गमक आहे. कारण आज परिस्थिति अशी आहे कीं, ब्रिटनला विक्री माल कसा खपवावयाचा अशी एक प्रकारें चिंता लागून राहिली आहे. गेल्या दोन वर्षांत उत्पादनाची मोहिम यशस्वी करून ब्रिटननें आपली निर्गत मोठ्या प्रमाणांत वाढविली आहे. युद्ध संपल्या नंतर दिसून येणारी विक्रेत्यांच्या बाजारपेठेची तेजी हळू हळू ओसरूं लागली असून, माल खरेदी करणारांना आतां अनुकूल काल प्राप्त झाला आहे. ही बदललेली परिस्थिति ध्यानांत घेऊन या पुढें ब्रिटन जास्तींत जास्त विक्री माल कसा बाहेर पाठवितां येईल या विचारामागें आहे असें दिसतें. अमेरिकेंतहि किंमती उतरूं लागल्या आहेत. परंतु किंमतीमधील उतार हा मंदीचा निदर्शक नव्हे असें तेथें प्रतिपादिलें जातें. यावरून कदाचित् यापुढें आर्थिक व्यवहारांत स्थिर धारणा निर्माण होईल असा अंदाज आहे. मंदीला अजून सुरवात झालेली नाहीं याचीं मुख्य कारणें जगांतील निरनिराळ्या, विशेषतः आशिया खंडांतील देशांत अजून उत्पादन नेहमींच्या परिस्थितीला पोंचलेलें नाहीं; तर उलट युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजना, कांहीं देशांतील अनवस्थेची परिस्थिति, युरोपियन देशांतही उत्पादन वाढविण्याची शक्यता, इत्यादि गोष्टींमुळें यंत्रसामुग्रीच्या स्वरूपाच्या मालाला व निरनिराळ्या शास्त्रांतील तज्ज्ञ लोकांच्या सल्ल्याला अद्याप अनेक ठिकाणीं मागणी आहे. त्या मागणीची परिपूर्ति विशेषतः ब्रिटन, अमेरिका, कॅनडा, झेकोस्लोव्हाकिया इ. सारख्या देशांकडून होणें संभवनीय दिसते. विक्रेत्यांची तेजी पूर्णपणें ओसरली असें नव्हे, तर विशेषतः चैनीच्या व अनावश्यक मालाच्या बाबतींत मालाची तेजी आतां पूर्णपणें नष्ट झाली आहे, व यंत्रसामुग्री आणि भांडवली माल यांच्या बाबतींत विक्रेत्यांना अजून अवसर आहे. त्यांतच आशिया खंडांतील कांहीं देशांत अजून तीव्र अन्न टंचाई भासत आहे. जगांतील अन्नधान्याचें उत्पादन गेल्या वर्षांत वाढलें असलें तरी कांहीं देशांच्या अन्नविषयक मागणीच्या तीव्रपणामुळें धान्याचे बाजारभाव जितक्या प्रमाणांत उतरावे तितक्या प्रमाणांत ते कदाचित् उतरणार नाहींत व याचा परिणाम अंतराष्ट्रीय व्यापारावर होईल.

ब्रिटनमध्यें वाटपपद्धति कमी करण्यांत येत आहे. कापडाचें वाटप तर रद्द केलें जाणार असें म्हणतात. उद्योगधंद्यांतील भांडवलावर सुटणाऱ्या व्याजाचें प्रमाण घटत चाललें आहे. पुस्तकें प्रसिद्ध करणारांचा धंद्यालाहि पूर्वींसारखी मागणी राहिलेली नाहीं. प्रसिद्धीच्या पूर्वींच पुस्तक विक्रते पुस्तकें खरेदीत असत परंतु आतां अशी आगाऊ खरेदी करण्याचें बंद झालें आहे. सिनेमा पाहाणारांची संख्या घटत चालली आहे.

ब्रिटनच्या आर्थिक परिस्थितीची गुरुकिल्ली म्हणजे निर्गत वाढणें व आंतराष्ट्रीय व्यापार विस्तृत होणें व कारखाने वाढणें. १९४५ नंतरचीं दोन वर्षें बाहेरच्या देशांच्या गरजा पुरविण्याइतकें उत्पादन ब्रिटनला करतां येईना. परंतु यंदा परिस्थिति अशी दिसते कीं जागतिक बाजारपेठेंत किंमती उतरत असल्यामुळें ब्रिटनला आयात करतां येईल, परंतु तेवढ्या प्रमाणांत निर्यात करतां येईल कीं नाहीं हा प्रश्न आहे.

उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला
**ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.**
ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.
टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादींसाठीं चौकशी करा:—
**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**
९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
तार : SAHYOG फोन : ३४५१९
**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**
( १ ) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज
( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ. )
( २ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. )
( ३ ) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट
( ले :—. रेवि ॲले, किं. २ रु. )
( ४ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज ॲंड व्हिलेज इंडस्ट्रीज इन बॉम्बे प्रॉव्हिन्स
( ले.:— एल. एन. रेणु, किं. १ रु. ४ आ. )

**सारस्वत**
**को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**
[ स्थापना १९१८ ]

सारस्वत बँक बिल्डिंग, मुंबई ४ टे. नं. ३१६७५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ४,२०,००० |
| रिझर्व्ह | ... | रु. २,५६,००० |
| ठेवी | ... | रु. ८५,३८,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. ९३,१५,००० |

बचतीच्या आकर्षक योजना
सब-ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )
वा. पुं. वर्दे, बी. कॉम्., अध्यक्ष.
प. ज. देशपांडे, बी. कॉम्., सेक्रेटरी.
पाडव्याच्या सुमुहूर्तावर बँकेची शाखा मार्केट बेळगांव येथें श्री. शं. वि. संझगिरी बी. कॉम्., सेक्रेटरी यांच्या देखरेखीखालीं सुरू झाली आहे.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें